## दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ०१/२०१८
## मधील निशाणी क्र. १ खालील आदेश

१. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जातील संक्षिप्त कथन असे आहे की, अर्जदारचा भाऊ निलकंठ काशिनाथ नंदनवार व त्यांची पत्नी गंगाबाई निलकंठ नंदनवार हे दोघे अनुक्रमे दि. ०७/१०/१९७७ व दि. ०३/०५/२०१७ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदारांव्यतिरिक्त मयताचे कोणीही वारस नाहीत म्हणून त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज दाखल झाल्यानंतर आक्षेप नोंदविण्याकरीता रितसर 'दैनिक संचार' या वृत्तपत्रात दि. ०४/०२/२०१८ रोजी जाहीर प्रसिध्दीकरण देऊन अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत काही हरकत असल्यास ३० दिवसांच्या आत हरकत नोंदविण्याची सुचना दिलेली होती. परंतु त्यास अनुसरुन कोणीही हरकत नोंदविलेली नाही.

४. अर्जदार शिवराम काशिनाथ नंदनवार यांनी नि.क्र. १३ अन्वये त्यांचे सरतपासणीचे शपथपत्र दिले आहे. त्यांच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता अर्जदार हा मयत निलकंठ यांचा भाऊ असल्याचे दिसून येते. तसेच निलकंठ याची पत्नी गंगाबाई निलकंठ नंदनवार हिचे दि. ०३/०५/२०१७ रोजी व निलकंठ याचे दि. ०७/१०/२०१७ रोजी निधन झालेले आहे. अभिलेखावर दाखल केलेल्या त्यांच्या मृत्यु प्रमाणपत्राच्या प्रतीवरुन त्यास पुष्ठी मिळते. रितसर जाहीर प्रसिध्दीकरण देऊनसुध्दा प्रस्तुत अर्जातील विनंतीनुसार वारस प्रमाणपत्र देणेबाबत कोणताही आक्षेप दाखल झालेला नाही. सबब अर्जास कोणीही आव्हान दिलेले नाही. हिंदू उत्तराधिकारी अधिनियम १९५६ च्या कलम ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्जदार हा मयत निलकंठ काशिनाथ नंदनवार यांचा भाऊ असल्याने ते त्यांच्या वर्ग–२ चा वारस आहे. या सर्व बाबी व साक्षीपुरावा लक्षात घेता मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, अर्जदार यांना त्यांचे विनंतीनुसार वारस प्रमाणपत्र देणे योग्य आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात आला.

२. अर्जदार हा हिंदू उत्तराधिकारी अधिनियम १९५६ च्या कलम ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मयत निलकंठ काशिनाथ नंदनवार यांचे वर्ग–२ चे वारस आहेत. तसे वारस प्रमाणपत्र अर्जदारच्या नावे जारी करण्यात यावे.

३. अर्जदार यांनी आवश्यक ती कोर्ट फी द्यावी.

दि. २५/०४/२०१८
अक्कलकोट

( ***प्र. प्र. पेठकर*** )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, अक्कलकोट.

---

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | C.J.J.D & J.M.F.C., Akkalkot. |
| **Name of Stenographer** | **:** | R. R. Gunhal |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 25 / 04 / 2018. |
| **Order uploaded on** | **:** | 26 / 04 / 2018.. |